# अक्षरवेध

त्रैमासिक अंक-३
ऑक्टोबर २०१६-डिसेंबर २०१६

डोअर स्टेप स्कूल - परिवर्तन प्रशिक्षण केंद्र



# परिवर्तन विषयी...

शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या ३ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याच्या कामात डोअर स्टेप स्कूल १९९३ पासून पुणे शहरात कार्यरत आहे. बांधकाम कामगारांच्या मुलांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्याच्या कामात संस्थेची मुळातील बांधिलकी आहे.

ही बांधिलकी जपण्यासाठी डोअर स्टेप स्कूलअंतर्गत विविध प्रकल्प राबवले जातात व त्या प्रत्येक प्रकल्पांची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी लागणारी कौशल्ये व कर्मचा-यांच्या क्षमताबांधणीकरता संस्था विशेष कार्यदक्ष आहे, हे डोअर स्टेप स्कूलने २००७ मध्ये सुरु केलेल्या 'परिवर्तन ट्रेनिंग सेंटरच्या' माध्यमातून दिसून येते.

आपल्या कामांच्या पद्धतीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याकरिता, स्वत:च्या कामाची गुणवत्ता वाढ होण्याकरिता, योग्य दिशेने व सृजनशीलतेने काम होण्याकरिता कर्मचा-यांना प्रशिक्षणाची नितांत गरज असते. कारण यामुळे प्रकल्प उद्दिष्टांची अंमलबजावणी व प्रभावी वितरण होण्यास मदत होते. याच दृष्टीने डोअर स्टेप स्कूलने ट्रेनिंग सेंटर सुरु केले. जे पुढील २ मुद्यांना लक्ष्य करून कर्मचा-यांना प्रशिक्षण देते-

१) कर्मचा-यांचे कौशल्य व डोअर स्टेप स्कूलचे उद्दिष्ट यांची सांगड घालणे.

२) कर्मचारी करत असलेल्या कामाव्यतिरिक्त इतर प्रकल्पातील काम करण्याकरीता कर्मचा-यांना सक्षम बनवणे.

डोअर स्टेप स्कूलच्या सर्व प्रकल्पातील उपक्रमांच्या गरजेनुसार या ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून कर्मचा-यांना प्रशिक्षण दिले जाते. परिवर्तन ट्रेनिंग सेंटर केवळ डोअर स्टेप कर्मचा-यांनाच नव्हे तर इतर संस्थांच्या कर्मचा-यांना देखील त्यांच्या मागणीनुसार मार्गदर्शनपर प्रशिक्षण देत आहे. जून २०१६ पासून 'कास्प' संस्थेबरोबर प्रशिक्षण सत्रे चालू आहेत. याचप्रमाणे सप्टेंबर महिन्यात 'होप फाउंडेशन' या संस्थेबरोबर ही आपले प्रशिक्षण झाले.

यंदाच्या वर्षी संस्थेतील वेगवेगळया विभागांतील उपक्रमांशीसंबंधीत मार्गदर्शिका काढण्याचा परिवर्तनचा मानस आहे. यापैकी 'प्रकल्प' या विषयावर आधारीत मार्गदर्शिकांचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.प्रशिक्षकांच्या क्षमताबांधणीकरीता त्यांना इतर संस्थांच्या उपयुक्त विषयावर असलेल्या प्रशिक्षणांना देखील पाठवले जाते.

# अक्षरवेध

अक्षरवेध चे पहिले व दुसरे त्रैमासिक आम्ही यशस्वीरीत्या प्रकाशित केले. या त्रैमासिक प्रकाशनाच्या माध्यमातून परिवर्तनला एका वेगळ्या व विशेष कार्याची प्रचिती येत आहे. मासिकासाठी ठरवलेल्या विषयावर होणाऱ्या चर्चेतून, संदर्भ वाचनातून, विचारविनिमयातून एक प्रकारच्या वैचारिक प्रक्रियेला चालना मिळत आहे. त्रैमासिकाच्या निमित्ताने दर तीन महिन्याच्या कामाचा आढावा घेता नवीन अनुभवांची भर पडत आहे.

सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या तुम्हा-आम्हा सर्वांसाठी नव काहीतरी देण्याचा आमचा हा मानस या मासिकाच्या निमित्ताने पूर्ण करण्याचा प्रयत्न नेहमीच राहील. आणि त्यात जर काही चुका झाल्या तर त्या चुका सुधारण्यासाठी आपल्या मार्गदर्शन व सहयोगातून सकारात्मक बदल करणे आम्ही आमचे कर्तव्य मानतो.

# या अंकात...

मागील अंकात आपण स्मरण कौशल्ये या विषयातून शिकण्यात स्मरणाचे महत्व पाहिले. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.काळानुरूप त्याचे स्वरूप बदलत जात आहे. आजच्या आधुनिक शिक्षणाची वाटचाल बघता पारंपारिक शिक्षणाचा पाया बघणे गरजेचे वाटते म्हणूनच या अंकाचा विषय शिक्षणातील नवे-जुने घेऊन त्याची मांडणी करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. गुरुकुल शिक्षण पद्धती पासून ते अगदी आत्ताच्या ई-लर्निंग शिक्षणापर्यंतचा प्रवास, शिक्षण प्रक्रिया व शिक्षण आयोगाची धोरणे,ज्ञानरचनावाद, भारतातील व्यावसायिक शिक्षणाचा प्रवास व होमस्कूलिंगची पुन्हा रुजत चाललेली पाळेमुळे या शिक्षण पद्धतींचा आढावा प्रस्तुत लेखामध्ये घेतला गेलेला आहे.

# या अंकात काय पहाल...


- शिक्षण एक प्रक्रिया
- शिक्षण प्रक्रिया आणि शिक्षण आयोगाची धोरणे
- शिक्षणाची वाटचाल
- ज्ञानरचनावाद
- शिक्षणाचे वैविध्यपूर्ण पैलू
- Journey of  Vocational Education in India
- होमस्कूलिंग – स्वयंरचित शिक्षणपद्धतीच्या वाटेवर

# शिक्षण एक प्रक्रिया

**शिक्षण म्हणजे काय?**

सर्वसामान्यपणे शिक्षण म्हटले की शाळा, विद्यार्थी, शिक्षक यांचे अध्ययन व अध्यापन, परीक्षा, निकाल किंवा अधिक खोलवर पाहिल्यास बालवाडी, पूर्व प्राथमिक, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, महाविद्यालये, विद्यापीठे या सर्व ठिकाणी चाललेले काम याचे चित्र नजरेसमोर येते. एखादी मुलगी हातशिलाई करून रोजगार मिळविते यातून तिचे शिक्षण सुरूच असते हा विचार फारसा पटत नाही. कारण शिक्षणाच्या वेगवेगळया स्तरावर वेगवेगळया विषयांचा होणारा अभ्यास हीच शिक्षणाची रूढ कल्पना आहे. मात्र तीच 'शिवणकामाचा डिप्लोमा" करत आहे असे सांगितले तर ते आपल्याला लगेच पटते म्हणजेच हा विचार मान्य केला जातो. याचाच अर्थ शाळेच्या चार भिंतीमध्ये दिले जाते आणि घेतले जाते तेवढेच फक्त शिक्षण होय असे सामन्यपणे मानले जाते.

शिक्षण ही प्रक्रिया अत्यंत व्यापक अशी आहे, या प्रक्रियेतून व्यक्ती, समाज, राष्ट्र व संपूर्ण विश्व यांची प्रगती करणे हा प्रमुख हेतू असतो. त्यामुळेच शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले जाते. म्हणजेच शिक्षण या शब्दात त्याचा संकुचित व व्यापक अर्थ या दोन्हींचा अंतर्भाव आहे.

शिक्षणाचा संकुचित अर्थ अधिक प्रमाणात व्यक्तींच्या शालेय जीवनाशी संबंधित आहे. शिक्षणाचा बाळबोध साधा अर्थ म्हणजेच शाळेत जाणे होय.

शिक्षण म्हणजे केवळ शाळा किंवा कॉलेजमध्ये जाणे नव्हे, कारण शाळेत जाण्यापूर्वीसुध्दा लहान मूल भाषा, दैनंदिन व्यवहारातील कौशल्ये आत्मसात करते.
आज प्राथमिक शिक्षणाच्या निम्न स्तरावरील उद्दिष्टांमध्ये वाचन, लेखन, गणन याबरोबर उत्पादन क्षमता, सुसंस्कार, सामाजिक उपयुक्तता, समायोजन, नागरीकत्वाची जाणीव इत्यादी घटकांचा समावेश केला आहे.याचाच अर्थ शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे.
पुस्तकी ज्ञानाला अनुभव व उपयुक्तता यांची जोड असणे आवश्यक आहे.

**शिक्षणाचा व्यापक अर्थ-**

प्रसिध्द अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञ **जॉन ड्यूई** यांनी शिक्षणाची व्यापकता स्पष्ट करताना शिक्षण म्हणजे विद्यार्थाच्या भावी जीवनाची तयारी नव्हे ती विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष अनुभवजन्य जीवन होय असे म्हटले आहे. जीवनात येणा-या  अनुभवानुसार प्राणी आपल्या वर्तमानात जो बदल किंवा जो विकास करतो त्याला शिक्षण असे म्हणतात. वर्तनात होणारा बदल इष्ट व अपेक्षित दिशेने घडून येणारा असेल तरच त्याला शिक्षण म्हणता येईल शिक्षण हा घटक स्थिर नसून गतिशील आहे. ती एक व्यापक प्रक्रिया आहे. व्यक्तीला पर्यायाने समाजाला घडविण्याचा प्रयत्न त्यातून सतत होत असतो.

**शिक्षणाचा अर्थ व व्याख्या**

- शिक्षणास इंग्रजी भाषेत Education असा शब्द वापरतात. हा शब्द मूळ लॅटिन शब्द Educare वरून इंग्रजीत आला आहे. Educare म्हणजे to bring up किंवा to draw out. व्यक्तिच्या ठायी

जे सुप्त गुण आहेत, त्या गुणांना जागृत करून त्यांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. हे गुण व्यक्तीत लपलेले असतात. ते सुप्तावस्थेत असतात. मूलतः माणसाच्या ठिकाणी जे आहे ते बाहेर खेचून काढणे हे शिक्षणात अंतर्भूत आहे.

● शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करताना अनेक शिक्षणतज्ञ व विचारवंतांनी व्याख्या स्पष्ट केल्या आहेत.

➢ **ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो-** यांनी आपल्या Republic या ग्रंथात जीवनाची अंतिम मूल्ये समजण्याची आणि अनुभवण्याची पात्रता मनुष्याला ज्यामुळे प्राप्त होते ते शिक्षण होय असे म्हटले आहे.

➢ **फ्रेंच निसर्गवादी तत्ववेत्ता रूसो-** शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या ठायी असणा-या अंतर्गत शक्तीचा विकास होय.

➢ **हर्बट स्पेन्सर-** सर्वांगसुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण होय.

➢ **मादाम मॉंटेसरी-** यांच्या मते मुलांचा स्वाभाविक विकास घडवून आणणे म्हणजे शिक्षण आहे.

● पाश्चात्य तत्ववेत्यांप्रमाणे भारतीय विचारवंतांनी शिक्षणविषयक विचार व्यक्त केले आहे.

➢ **ऋग्वेद-** जो घटक मनुष्याला स्वावलंबी व स्वार्थनिरपेक्ष बनवितो ते शिक्षण होय.

➢ आद्य शंकराचार्य- आत्मज्ञान व आत्मसाक्षात्कार म्हणजे शिक्षण होय.

➢ **महात्मा गांधी-** शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन आणि आत्मा या त्रयींमध्ये जे सुप्त उत्तमत्व आहे त्याचा सर्वांगिण विकास घडवून आणणे.

➢ **शिक्षणाची विविध वैशिष्ट्ये-**

शिक्षण प्रक्रिया ही केवळ ज्ञानात्मक पातळीवर चालते असे नव्हे. भावात्मक किंवा क्रियात्मक (शारीरिक) पातळीवर चालणा-या क्रियांचाही शिक्षणात समावेश होतो. व्यक्ती ज्ञान ग्रहण करते. तिच्या बुध्दीचा, विचार शक्तींचा, कल्पना व तर्क शक्तीचा विकास होतो. ही ज्ञानात्मक पातळी होय. व्यक्ती बोलते, चालते, खेळते, पोहते, वाहन चालविते, स्वयंपाक करते अशी विविध कौशल्ये आत्मसात करते. हा व्यक्तीचा शारीरिक किंवा क्रियात्मक विकास आहे.

➢ शिक्षण प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, शिक्षण व भोवतालचा परिसर हे तीन घटक अत्यंत महत्वाचे आहे.या तीन घटकांत आंतरक्रिया घडत असतात आणि त्यातून शिक्षण साकार होत असते. शिक्षण प्रक्रिया स्थिर नाही गतिमान आहे. या प्रक्रियेत अनेक बदल संभवतात. शिक्षणाचे स्वरूप प्रवाही आह, शिक्षण प्रक्रियेतून प्रगतिशीलता अपेक्षित असते, चांगल्या प्रकारचा बदल अपेक्षित असतो.

➢ शिक्षण ही एक हेतुपूर्ण घडणारी प्रक्रिया आहे. हेतुविरहित कोणतीही गोष्ट आपण करत नाही.प्रवासाला जाण्यापूर्वी जसे कोठे जायचे हे निश्चित असते तसे शिक्षण घेण्याचा हेतू काय आहे हे निश्चित असायला हवे. सुजाण नागरिक घडविणे हा हेतू असेल तर तो डोळयांसमोर ठेवून तो पूर्ण करण्यासाठी सर्वजन प्रयत्नशील असतात.

आजच्या शिक्षणपध्दतीचा हेतू कुठे जाताना दिसतो? यावर प्रत्येकाने विचार करणे आवश्यक आहे.


**अनिता कापरे, स्नेहल भुते – प्रशिक्षक**
**परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे**

# शिक्षण प्रक्रिया आणि शिक्षण आयोगाची धोरणे

काही शिक्षणशास्त्रज्ञांच्या मते,

शिक्षण ही द्विकेंद्री प्रक्रिया आहे. अमेरिकेन शिक्षणतज्ञ जॉन ड्यूई यांच्या मते, शिक्षण प्रक्रियेत शिक्षक, विद्यार्थी आणि सामाजिक प्रेरणा या तीन घटकांचा समावेश होतो.जॉन ड्यूई यांच्या मते, शिक्षण म्हणजे केवळ भावी जीवनाची तयारी नव्हे तर विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष अनुभवजन्य शिक्षणच होय. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीच्या ठिकाणी भोवतालच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी समरस होण्याची पात्रता निर्माण होते व सामाजिक कार्यक्षमता मनुष्याच्या अंगी येते. शिक्षण प्रक्रियेत सामाजिक प्रेरणेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. सामाजिक प्रेरणेमुळे तर व्यक्ती मूळ शिक्षण घेण्यास सुरूवात करते.

सामाजिक वातावरण हे बालकाच्या वाढीस आणि विकासास पोषक असते. समाजातूनच शाळा निर्माण होतात आणि या शाळाच सामाजिक विकासाचे कार्य करीत राहतात. या दृष्टीने समाज सामाजिक तत्त्वे आणि सामाजिक आंतरक्रिया या गोष्टींचा शिक्षणात समावेश केल्याशिवाय शिक्षण परिपूर्ण होणार नाही.म्हणूनच शिक्षण ही प्रक्रिया विद्यार्थी व शिक्षक यांच्यापूरती मर्यादित राहू शकत नाही.विद्यार्थी आणि शिक्षक या घटकांबरोबर अभ्यासक्रम यांचाही समावेश केला पाहिजे अशा प्रकारे शिक्षण ही त्रिविध प्रक्रिया आहे.



शिक्षण हे गतीशील असते. देशानुसार, काळानुसार,शिक्षणाची उद्दिष्टे बदलत असतात. शिक्षणविषयक तत्वज्ञानातही काळानुसार बदल होत गेला. आधुनिकीकरणामुळे अनेक क्षेत्रात बदल होत गेले. या विविध क्षेत्रातील बदलानुसार शिक्षणक्षेत्रातही अनेक कल्पना पुढे येत गेल्या. शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे सुध्दा तीच राहिली नाहीत तर त्यामध्ये काळानुसार परिस्थितीनुसार बदल होत गेले.

भारतास १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वात महत्वाचे काम कोणते झाले असेल तर भारतीय राज्यघटनेच्या आधारे शिक्षणाची पुनर्रचना केली गेली. राष्ट्रीय शिक्षणासाठी अनेक आयोग व समित्या नियुक्त करण्यात आल्या -

- **वर्धा शिक्षण परिषद (इ.स १९३७ )**

महात्मा गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार इ.स १९३७ मध्ये वर्धा शिक्षण परिषदेने मूलभूत शिक्षण पध्द्तीची तत्वे निश्चित केली होती.या परिषदेने नैतिक आणि धार्मिक शिक्षणाचे स्वरुप स्पष्ट केले. धार्मिक शिक्षणामुळे कदाचित एकतेस तडा जाईल आणि संघर्ष निर्माण होईल यासाठी शैक्षणिक योजनेपासून धार्मिक शिक्षण दूर ठेवण्यात आल्याचे दिसून येईल.

- **विद्यापीठ शिक्षण आयोग**
  **( इ. स. १९४८-४९ )**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ शिक्षण आयोगाने नैतिक व धार्मिक शिक्षणाचा पुनर्विचार केला.संकुचित धार्मिक शिक्षणाऐवजी थोर धर्मप्रर्वतक आणि तत्वचिंतकांचे व्यक्तित्व आणि विचार विविध धर्म ग्रंथातून वर्णन केलेले विश्वधर्माचे प्रबोधन, धर्माचा तुलनात्मक अभ्यास, धर्माचे तत्वज्ञान यावर आधारित व्यक्तिमत्व विकासास आवश्यक वाटणा-या नैतिक व आध्यात्मिक शिक्षणावर भर देण्यात आला.

- **माध्यमिक शिक्षण आयोग.(१९५२-५३ )**

डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शिक्षण आयोगाने प्रार्थना, थोर व्यक्तींची चरित्रे यांच्याद्वारे नैतिक व आध्यात्मिक संस्कार यावर भर दिला. धार्मिक द्वेष, संघर्ष भेदभाव यासारख्या संघर्षमय घटकांपासून शिक्षण मुक्त रहावे तसेच व्यक्ती व समाज यांच्या निकोप विकासासाठी संस्कार शिक्षणाच्या माध्यमातून घडावेत असे आग्रह पूर्वक मांडते.

- **धार्मिक व नैतिक शिक्षणविषयक समिती-**
  **( इ. स. १९५९ )**

श्री प्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त केलेल्या धार्मिक व नैतिक शिक्षणविषयक समितीचा व्यापक विचार दिसून येतो.इतरांशी योग्य रितीने वागणूक करण्यास जे मदत करते ते नैतिक मूल्य आणि इतरांकरिता किंवा श्रेष्ठ व उदात्त कारणासाठी कल्याणासाठी निस्वार्थपणे त्यागाची प्रेरणा देते ते आध्यात्मिक मूल्य होय. या समितीने प्रार्थना, समूहगीते, आदर्श जीवन चरित्रे,नैमित्तिक स्वरुपाचे सांस्कृतिक कार्यक्रम,शिस्त आणि संयम यासाठी उपयोगी असणारे शारीरिक शिक्षण,क्रीडा गीते, कथाकथन, श्रेष्ठ दर्जाचा वाङःमयाचा अभ्यास यांचा शिक्षणात आवर्जून समावेश केला.चांगल्या सवयी व शिष्टाचार हा शिक्षणाचा महत्वाचा भाग मानला आहे. डॉ राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यापीठ शिक्षण आयोगाने जे विचार मांडले.त्यांचा पुनरुज्जार या समितीने केला असून संकुचित धार्मिक शिक्षणाऐवजी विविध धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासास महत्व दिले आहे.

- **भावात्मक एकात्मता समिती-**
  **( इ. स. १९६१)**

देशातील विविध धर्मातील तत्वांचे आकलन व्हावे परस्परांमध्ये सामंजस्य निर्माण व्हावे अशा प्रकारच्या कार्यक्रमांवर भर द्यावा यासाठी डॉ. संपूर्णानंद यांच्या नेतृत्वाखाली ही समिती स्थापन झाली.राष्ट्रीय एकता आणि मानव कल्याण दृष्टीसमोर ठेवून अभ्यासक्रमाची रचना करावी असे या समितीने सुचविले.

- **भारतीय शिक्षण आयोग ( इ. स. ९६४-६६)**

आधुनिकीकरण म्हणजे नैतिक अध्यात्मिक व आत्मसंयमाचे महत्व नाकारणे नव्हे असे डॉ.कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केलेल्या शिक्षण आयोगात म्हटले आहे. नैतिक शिक्षण देण्यासाठी आयोगाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पध्द्ती सुचवल्या. प्रत्यक्ष प्रकारात नैतिक अध्यात्मिक मूल्य शिक्षणासाठी दोन तासिका वेळापत्रकात असाव्यात. प्राथमिक शिक्षणात गोष्टीरुपाने नैतिक शिक्षण द्यावे. वाचन पुस्तकात नितिकथांचा समावेश असावा.शाळेत समूहगान म्हटले जावे.सर्व धर्मांचे उत्सव सार्वत्रिक स्वरुपात साजरे करावेत. अप्रत्यक्ष प्रकारात सभोवतालचे वातावरण, शिक्षकांच्या आचरणाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या चारित्र घडणीवर होत असतो.सर्व शिक्षकांनी स्वतःच मूल्य शिक्षणाची जबाबदारी घ्यावी व आपल्या वागणुकीतून प्रामाणिकपणा, सचोटी, सहकार्य, आदरभाव ही मूल्य विद्यार्थ्यांच्यात रुजवावीत असे नमूद केले आहे.

- **शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरण (१९६८)**

  संसदीय सभासदांची एक समिती नियुक्त केली. या समितीने मानवता ,आंतरराष्ट्रीय, सांस्कृतिक मूल्य संवर्धन तसेच चारित्र्य निर्मितीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.

- **एज्युकेशन फॉर अवर पिपल-**

  **( इ. स. १९७८ ते ८७)**

श्री. तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या या समितीने पुढील दहा वर्षांसाठी शिक्षणविषयक विकासाचे धोरण या विषयाचा अहवाल सादर केला. त्यात चारित्र्यसंवर्धन,वैज्ञानिक दृष्टीकोन, सांस्कृतिक मूल्यसंवर्धन यावर भर दिला.

- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)**

हा भारतीय शिक्षण व्यवस्थेतील एक महत्वाचा टप्पा आहे यात विशेष म्हणजे भारतीय शिक्षण पध्द्तीचे पूर्वमुल्यांकन केल आहे. या धोरणाचा उद्देश लोकांना शिक्षण उपलब्ध करुन देणे हा नसून शिक्षणाच्या गुणवत्तेत भरीव स्वरुपाचा बदल करणे असा आहे. समाजातील वंचितांना शिक्षणाचा अधिक फायदा मिळावा यासाठी विशेष प्रकारचे नियोजन या धोरणात केले आहे , याशिवाय सुजाण नागरिक तयार करणे, उत्पादन क्षमता वाढविणे तसेच आत्मविश्वास निर्माण करणे हेही हेतू आहेत.

पंतप्रधान राजीव गांधी यांनी हे नवे धोरण जाहीर केले यात शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया यांचा पुनर्विचार करताना मूल्यशिक्षणाची कल्पना सांगितली आहे. १९६६ च्या धोरणात शिक्षणाच्या ब-याच सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्या तरी १९६६ च्या शैक्षणिक धोरणाची सर्वच उद्दिष्टे साध्य झाली नाहीत सध्याच्या शिक्षणाचे स्वरुप बदलणे गरजेचे आहे हे लक्षात आल्याने भारत सरकारने (१९८६) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले.

- सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून इ.१ली ते ८वी पर्यंत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती अमलात आणली. या इयत्तांमधील मुला-मुलींना दरवर्षी ढकलले जाणार याची हमी शिक्षणप्रक्रियेने घेतली आहे.त्यामुळे आपण नापासच होणार नाही, ही मानसिकता त्यांच्यात निर्माण झाली आहे.

अलीकडे ज्ञानरचनावाद हा शब्द शिक्षणप्रक्रियेत अनेक वेळा वापरला जात आहे. हा ज्ञानरचनावाद

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF२००५)याचा तो पाया आहे 'त्याच प्रमाणे बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधीनियम २००९ (RTE) मधील कलम २९ मधेही सांगितले आहे. सामाजिक बदल घडवण्याच्या प्रक्रियेत शिक्षणाचे स्थान- भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती व थोर शिक्षणशास्त्रज्ञ डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षण सामाजिक बदलांचे प्रमुख माध्यम मानले. ते म्हणतात-

सामाजिक बदल घडवण्याच्या प्रक्रियेत शिक्षणाचे स्थान- भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती व थोर शिक्षणशास्त्रज्ञ डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षण सामाजिक बदलांचे प्रमुख माध्यम मानले.ते म्हणतात-

'Education is an agent for social change, what in simple societies was done by the family , the religious, social and political institution has to be done by educational institutions today.

शिक्षण आणि सामाजिक बदल यांचा संबंध जवळचा आहे. शिक्षणामुळे सामाजिक व सांस्कृतिक वारसा जतन केला जातो. हा वारसा पुढील पिढीकडे दिला जातो, तर शिक्षणाने सामाजिक व्यवस्थापन अभ्यासक्रमातील उद्दिष्टे, अध्यापनपध्दती यामध्ये बदल करावा अशी आपेक्षा समाज करतो.समाजाने काही उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या होत्या. त्या शैक्षणिक संस्थांनी समाजात योग्य बदल घडविण्यास मदत होते.

सामाजिक बदल घडविण्यासाठी शिक्षण समाजरुपी मनाची मानसिक व वैचारिक पार्श्वभूमी तयार करण्यासाठी मदत करते.शासनाने केलेले कायदे जनमानसात रुजवण्यासाठी शिक्षण कार्य करते.

स्त्री शिक्षणाला चालना देऊन निरक्षरता कमी करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्रात मुलींना १२वी पर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात आले.याला अनुकुल असे वातावरण शिक्षणाच्या माध्यमातून तयार करण्याचा प्रयत्न सतत केला जात आहे. आज ही खेड्यात मुलींच्या शिक्षणात लोक उदासीन आहेत.म्हणून शिक्षणातून वैचारिक पार्श्वभूमी तयार करणे हे शिक्षणाचे कार्य आहे.

**रेखा खिलारे ,मनिषा भोसले.- प्रशिक्षक परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे**

# शिक्षणाची वाटचाल

भारतीय संस्कृतीचा कालखंड खूप मोठा आहे. या कालखंडातील इ. स. पूर्व १००० ते १२०० पर्यंतचा प्राचीन कालखंड म्हणून ओळखला जातो. या प्राचीन कालखंडाचे ही चार उपखंडामध्ये रुपांतर केले आहे. वैदिक काळ, उपनिषद काळ, धर्मशास्त्र काळ आणि पुराण काळ असे चार उपखंड आहेत. गंगा, यमुनेच्या खो-यातील समृद्ध प्रदेशात आर्यांनी संस्कृत भाषेतून वेदांची निर्मिती करुन आपल्यासाठी ज्ञानभांडारच उपलब्ध केले आहे.

प्राचीन काळातील शिक्षणाची सुरुवात धर्मासाठी झाली. सर्वसामान्यांना संस्कृत भाषा अवगत नसल्याने कोणीतरी विद्वानांनी समजावून सांगावे लागत असे. येथेच आचार्यांची आणि गुरुंची आवश्यकता भासली व गुरुगृही विद्या संपादनासाठी जाण्याची प्रथा सुरु झाली. यातूनच गुरुकूल पद्धतीला सुरुवात झाली. या पद्धतीमध्ये गुरुंची व त्यांच्या कुटूंबियांची सेवा करावी लागे. भारतीय तत्वज्ञान हे धर्मावरच आधारीत असल्याने या पद्धतीमध्ये गुरु सामान्यपणे धर्मोपदेशक असत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. या संकल्पनेत चांगली जीवनपद्धती सामावलेली आहे. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीतील जीवनविषयक ध्येये आणि शिक्षणविषयक ध्येये परस्परावलंबी व परस्परपूरक होती. गुरूकूल आणि आश्रमापासून सुरू झालेला हा शिक्षणाचा प्रवास पुढे विद्यापिठात रूपांतरीत झाला. इ. स. पूर्व ८ ते १२ व्या शतकांच्या कालावधीत भारत हा जगातील शिक्षणाचा सर्वात मोठा केंद्रबिंदू होता. याच काळात जगातील पहिले विश्वविद्यालय **“तक्षशिला व नालंदा विद्यापीठ”** यांचा उल्लेख भारतीय प्राचीन इतिहासात आढळतो.

प्राचीन काळातील जीवन मर्यादित आणि अप्रगत असल्यामुळे स्वतःच्या विकासापुरते निश्चित केलेले ध्येय सुसंगत वाटते.त्या काळात आध्यात्मिक विकासाबरोबर ऐहिक व भौतिक जीवनाचा विचार , सुख समृध्दी चा विचार फारसा केला गेला नाही.जसजसा काळ पुढे गेला तसे काळाप्रमाणे मानवी जीवनात सुधारणा होत गेल्या.मानवी जीवन उन्नत व प्रगत होऊ लागले. विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिक विकास यामुळे विचारांना शास्त्रीय स्वरुप प्राप्त झाले.धर्माचा संकुचित विचार मागे पडू लागला.जीवनात भौतिक विकासाला अधिकाधिक महत्व प्राप्त होऊ लागले.

भारतात इंग्रजांचे आगमन विकासाच्या दृष्टीने क्रांतीकारक ठरले. भारतात इंग्रजी शिक्षणास सुरुवात झाली. इंग्रजी भाषेमुळे पाश्चात्य देशातील नवे विचार ,आधुनिक तत्वज्ञान, वैज्ञानिक प्रगती इ. गोष्टींचा परिचय झाला. देशात धर्म आणि तत्वज्ञान यांचे महत्व कमी झाले. इंग्रजांनी जी शिक्षण पध्द्ती सुरु केली होती. ती मेकॉलेच्या तत्वांवर आधारित होती ही पध्दत पूर्णतः पुस्तकी शिक्षणावर आधारित होती इथल्या संस्कृतीत वाढलेल्या इथल्या रक्ताच्या माणसांना पाश्चात्य शिक्षण देऊन नोकरशाहीला आवश्यक वर्ग निर्माण करण्याचं उद्दिष्ट त्यामध्ये होतं. त्यात कोणतीही सामाजिक उद्दिष्टं नव्हती. मेकॉलेच्या तत्वांप्रमाणे पुस्तकाचा सांधा फक्त शिक्षणाशी लावला गेला, समाजाशी किंवा व्यवहाराशी नाही. शिक्षण हे गतीशील असते. देशानुसार, काळानुसार,शिक्षणाची उद्दिष्टे बदलत असतात. शिक्षणविषयक तत्वज्ञानातही काळानुसार बदल होत गेला.

आधुनिकीकरणामुळे अनेक क्षेत्रात बदल होत गेले.या विविध क्षेत्रातील बदलानुसार शिक्षणक्षेत्रातही अनेक कल्पना पुढे येत गेल्या. शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टेसुध्दा तीच राहिली नाहीत तर त्यामध्ये काळानुसार परिस्थितीनुसार बदल होत गेले. सध्या आपल्याकडील शालेय शिक्षण घोकंपट्टीच्या शालेय शिक्षणाकडून प्रकल्प-अनुभवाधारीत शिक्षणव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. यापूर्वीचे शिक्षण हे शिक्षणकेंद्रित होते आणि शिक्षकांचा भर हा फक्त आणि फक्त अभ्यासक्रम ,पाठ्यक्रम, हस्तपुस्तिका .अहवाल......अशा कागदोपत्री साहित्यावर होता. परिक्षा हाच केंद्रबिंदू असल्याने शिकणं आणि शिकवणं परीक्षेभोवती केंद्रित होत. म्हणजेच परीक्षेत जे विचारलं जाऊ शकतं तेच आम्ही शिकवणार आणि विद्यार्थी फक्त तेवढाच अभ्यास करणार.

बेंजामिन ब्लूम यांनी काही सुधारणा सुचवल्या होत्या -

१. अभ्यासक्रमाची छोट्या- छोट्या टप्प्यात विभागणी करा .

२. विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करा आणि शेवटी परीक्षा घ्या.

३. परिक्षेकरता गुणांऐवजी ग्रेडेशन सिस्टीमचा पर्याय सुचवला होता.

आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये शाळा-विद्यार्थी-शिक्षक ही संकल्पना रुढ आहे. शिकण्यासोबत शाळेतून उमलणं, फुलणं, बहरणं हे घडत रहावं म्हणून प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे नविन शिक्षण पध्दती प्रचलीत होत आहे. आजचे युग हे विज्ञान व नव तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे नविन पिढीचा बौध्दिक विकास सातत्याने होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक प्रगत महाराष्ट्र या उपक्रमाव्दारे नव्या शैक्षणिक तंत्रज्ञानाचा व आधुनिक शिक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यात प्रामुख्याने पुढील पध्दतींचा समावेश आहे.

१.ज्ञानरचनावाद

२.डिजीटल शाळा

३.संगणक व इतर तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षण (इ-लर्निंग)

**१. ज्ञानरचनावादः-**

अलिकडे ज्ञानरचनावाद हा शब्द शिक्षणप्रक्रियेत अनेक वेळा वापरला जात आहे. हा ज्ञानरचनावाद एकदम आला कोठून? इत्यादी प्रश्न आपल्या मनात

येतात. ज्ञानरचनावादी शिक्षण प्रक्रियेसंदर्भात प्रामुख्याने पियाजे, जोहन ड्यूई, वायगोट्स्की यांच्या विचारांशी साम्य आहे. मूल आपल्या मनातील जगाबाबतच्या धारणा आणि परिसरातून मिळणारा अनुभव यांच्यातील आंतरक्रियेतून स्वतःच्या ज्ञानाची रचना करत असते असा रचनावादाचा मध्यवर्ती विचार आहे. मूल आपल्या ज्ञानाची रचना कशी करते यावर ज्ञानरचनावाद बराच प्रकाश टाकतो.

**२. डिजीटल शाळा व ई-लर्निंग -**

शाळा म्हटलं की तेथे चालणा-या कामकाजाचे तीन बाबतीत वर्गिकरण करता येते. अध्ययन-अध्यापन, मूल्यमापन व शालेय व्यवस्थापन जर कोणतीही शाळा या तिन्हीही गोष्टी इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या आधारे करत असतील तर त्या शाळा डिजीटल शाळा असं म्हणता येईल.

१. संगणक व इतर तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण (इ-लर्निंग)
२. संगणकाद्वारे मूल्यमापन (ऑनलाईन एक्झामिनेशन)
३. शाळा व्यवस्थापन प्रणाली(स्कूल मॅनेजमेंट)

**३. संगणक व इतर तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण (इ-लर्निंग)**

विद्यार्थी स्वतः यात सहभागी होऊन अध्ययन करतील या पध्दतीने पाठ्यक्रमाच्या गरजेनुसार संगणक, मोबाईल, रेडिओ, टिव्ही, इंटरनेट, प्रोजेक्टर इ. इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर शाळेत करणे तसेच विविध संकल्पनांचे मॉडेल बनवून ॲनिमेशन प्रेझेंटेशन/व्हिडीओ माध्यमातून प्रभावीपणे  सादर करणे म्हणजे इ-लर्निंग होय.

आज पारंपारिक पध्दतीने भूगोल विषयातील नकाशा वाचन शिकविताना मुलांना छापील नकाशा वापरला जातो.परंतु मुले त्या बारीक अक्षरात छापलेल्या नावामुळे कंटाळतात. मुलांचा शिकण्याचा उत्साह कमी होतो. त्याऐवजी ‘गुगल’ या सेवेचा वापर केला तर मनोरंजक पध्दतीने स्वतःचे घर, शाळा, एखादे ठिकाण शोधू शकतात. अशा आनंददायी पध्दतीने शिकण्याचा हेतू साध्य होतो.

**सुनिता इंगवले – प्रशिक्षक**

**परिवर्तन प्रशिक्षण केंद्र,पुणे**

# ज्ञानरचनावाद

शिकणं ही प्रत्येक सजीवांची नैसर्गिक प्रक्रिया आहे. कल्पना करुया....आपले शरीर म्हणजे एक शाळा आहे या शाळेचा मुख्याध्यापक आपला मेंदू आहे व पंच ज्ञानेंद्रिये हे आपल्याला शिकवणारे शिक्षक आहेत. मानव जातीला बुद्धीचे वरदान लाभल्यामुळे आदिम काळात स्वानुभवातून माणूस शिकू लागला यातूनच विविध कौशल्ये प्राप्त केल्यानंतर सुरक्षित व सुखसोयींपूर्णतेने जीवन जगता येते स्थैर्य लाभते व आपली प्रगती साधता येते हे समजल्यावर स्वतःच्या प्रगतीबरोबरच पुढील पिढ्यांचा उद्धार करण्यासाठी त्यांनी शिकणे गरजेचे आहे या विचारातून 'शिकणं 'या प्रक्रियेला सुरुवात झाली. शिक्षण एक प्रक्रिया असली तरी पारंपारिक पद्धत ते आतापर्यंतच्या शिक्षण पध्दतीमध्ये काळानुसार टप्प्याटप्याने बदल झालेले दिसतात. यातील काही बदल संक्रमीत आहेत तर काही जाणीवपूर्वक बदल केले आहेत.ते का व कशासाठी केले आहे याचे उत्तर शोधण्याआधी आपल्या पूर्वापार चालत आलेल्या धारणा काय आहेत हे समजून घेणे गरजेचे आहे.

'मूल हे मातीचा गोळा असते आपण देऊ तसा आकार ते घेते.' या वाक्यातच मूल हे एक स्वतंत्र व्यक्तीमत्व असते हेच आपण विसरतो, त्याने वर्तन कसे करावे व आपण त्याच्याबरोबर वर्तन कसे करावे हे आपणच ठरवत असतो.आपलं मूल जेव्हा शाळेत प्रवेश करते. तेव्हा त्याच्याकडे जवळ जवळ साडेतीन हजार इतकी शब्दसंपत्ती असते व या आधारेच मूल आपले विचार, भावना व्यक्त करत असते.या गोष्टीची जाणीव जेव्हा झाली तेव्हा 'मूल केंद्री शिक्षण' असावे असा एक विचार पुढे आला. शिक्षण देणं म्हणजे ज्ञान देणं, नव्याची ओळख करुन देणं,ते त्यांच्यात रुजवणं हे सगळं आलंच परंतु या आधीही मुलांच्या मातीत जे काही चमकणारे कण आपल्याला सापडतील ते म्हणजेच 'ज्ञानरचना' होय.

ज्ञानरचनावादावर शिक्षणतज्ञांमध्ये सध्या बरीच वैचारीक मांडणी सुरु आहे. या संकल्पनेला इंग्रजीत **Constructivism** म्हणतात. जरी ही संकल्पना परदेशातली वाटली, तरी गुरुकुल शिक्षण पद्धतीच्या संदर्भातही तिची मांडणी करता येईल.आता नुसतं रचनावाद म्हटलं तर चित्रकलेच्या संदर्भात काही समजून घेता आलं असतं. ज्ञानाच्या संदर्भात हा काय रचनावाद ? शिवाय 'वाद' म्हटलं की भांडण, मतभेद,वादी-प्रतिवादी असं आपल्या मनात येतं. एखाद्या विचारांचा एक प्रवाह निर्माण

होतो तेव्हा आपण 'वाद' हा शब्द वापरतो. आपल्या विचारांबद्दल आग्रही असणं, ठाम असणं, सतत मांडणी करत राहणं,या दिशेने विचार केला तर ज्ञानरचनावाद हा शब्द आपल्याला पटेल.

थोडक्यात सांगायचे झाले तर पारंपारिक शिक्षण पद्धती वर्तनवादावर आधारीत आहे तर आधुनिक शिक्षणद्धतीत ज्ञानरचनेचा समावेश केलेला दिसतो. उदा. मुळाक्षरे शिकवण्याच्या दोन्ही पद्धतीतील फरक समजून घेवूयात -

| पारंपारिक पद्धत | आधुनिक पद्धत |
|---|---|
| - पाठांतर पद्धत- अ आ इ ई / क ख ग घ | - शब्द पद्धत – अ आ ई न स |
| - आधी स्वर –व्यंजने व नंतर बाराखडी शिकवणे. | - शब्द पद्धती असल्यामुळे स्वर –व्यंजने व बाराखडीची चिन्हे टप्प्यानुसार शिकवणे. |
| - फळा व खडू या साधनांच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या संकल्पनांचे स्पष्टीकरण | - वेगवेगळया आकारातील साधन-साहित्याच्या माध्यमातून गटपद्धतीतून संकल्पनांचे स्पष्टीकरण |
| - अक्षरे गिरवून गिरवून शिकवले जाते. | - एकाच अक्षराची ओळख अक्षर-चित्र जोडी,सारखी अक्षरे शोधा,पाहूणा ओळखा इ. खेळातून दृढीकरण केले जाते. |
| - अनुलेखनावर भर असतो. | - दृश्य-वाचनावर भर असतो. |
| - शिक्षक व्याख्यान पध्दतीने शिकवतो. | - शिक्षक मार्गदर्शक,सुलभक असतो. |
| - मुले ऐकण्याचे व पाहण्याचे काम करतात. | - मुले विविध कृतींमध्ये सहभागी असतात. |

इतरांच्या शिकविण्या पेक्षाही स्वतःच्या शिकण्यातून मुलांचा विकास अधिक होत असतो. विद्यार्थी हा ज्ञानाचा रचियेता आहे. विद्यार्थी हा स्वतःच ज्ञान निर्मिती करत असतो.त्याकरीता शाळेतील वर्गखोल्यांच्या जमिनीवर वेगवेगळ्या विषयाचे तळफळे आखल्यास विद्यार्थी त्यातून स्वतःच शिकतात आपण नव्या अनुभवांना सामोरे जाताना त्या अनुभवाच्या आशयांचा आपल्या पूर्वानुभवाच्या आधारे अर्थ लावून आपण जगत असलेले विश्व समजवून घेणे या भूमिकेवर ज्ञानरचनावादी तत्वज्ञान आधारलेले आहे. मूल आपल्या मनातील जगाबाबतच्या धारणा आणि परिसरातून मिळणारा अनुभव यांच्यातील आंतरक्रियेतून स्वतःच्या ज्ञानाची रचना करत असते असा रचनावादाचा मध्यवर्ती विचार आहे. मूल आपल्या ज्ञानाची रचना कशी करते यावर ज्ञानरचनावाद बराच प्रकाश टाकतो. मूलाची

अगदी जन्मापासून अवतीभोवतीचे जग समजून घेण्याची धडपड आहे. उदा. सुरुवातीला 'बाबा' या शब्दाचा अर्थ पुरुष या शब्दासारखाच असतो. त्यामुळे सर्व पुरुषांसारख्या दिसणा-या व्यक्तींना मूल बाबा म्हणते.

मुलाने संकल्पना बांधण्याची ही नैसर्गिक प्रक्रिया आहे.म्हणजेच बालक जेव्हा एखादा अनुभव प्रथमतः घेते तेव्हा त्याची विशिष्ट अशी प्रतिमा बालकाच्या मनात उमटते. हे त्या बालकाचे ज्ञान असते. या ज्ञानाच्या विकासात दोन प्रक्रिया असतात. जेव्हा एखादा अनुभव घेतला जातो तेव्हा तो आधीच्या अनुभवांच्या रचनेशी पडताळून पाहिला जातो.

- **या शिक्षणपध्दतीत वर्गातील शिक्षणपध्दतीत 'शिकविण्या'कडून 'शिकण्या'कडे जायचे आहे. मुलांना 'शिकू' द्यायचे आहे वर्गातील व शाळेतील सर्व रचना, वातावरण हे विद्यार्थांच्या शिकण्याच्या अंगांनी तयार करावयाचे आहे.**
- **वर्गातील शिक्षण पुस्तकी अभ्यासाकडून वास्तव अनुभवाकडे वळवायचे आहे.**
- **मुलांना वेगवेगळया संधी द्यायच्या आहेत.**
- **मुलांना स्वतः सहभागी होऊन स्वयंअध्ययनातून शिकण्याचा अनुभव द्यायला हवा.**

ही संकल्पना अशी आहे की पुस्तकी किडा होणे हे शिक्षणाचे ध्येय नसून त्या विषयाबद्दल स्व अनुभवाने समजून घेणे व संकल्पना दृढ करणे तसेच स्वयंअध्ययनातून शिकणे, कृतीतून, हसतखेळत, मनोरंजनातून ज्ञान, अध्ययन, अनुभवातून जिज्ञासेचे समाधान या सर्व बाबींची पूर्तता या ज्ञानरचनावाद संकल्पनेत होते. उदा- गणित शिकवायचे असेल तर मणी, आईस्क्रिमच्या काड्या, चिंचोके, खडे यांच्या साहाय्याने शिकवले तर मुलांना समजायला सोपे जाते.

जुने टाकून नव्याचा स्विकार करणे हे खरे तर प्रगतीचे लक्षण मानले जाते. पण जुन्यातले टाकाऊ काय आहे व नव्यातले स्विकारण्यासारखे काय आहे हे ओळखण्यासाठी तज्ञांबरोबरच अनुभवी,सृजनशील व संवेदनशील शिक्षकाची गरज आहे. शिक्षण देणं म्हणजे 'छडी लागे **छम छम'** असे नसून 'तू धूप है **छम** से बिखर तू है नदी ओ बेखबर' असा असला पाहिजे, या दोन ओळीतील '**छम'** या प्रतिध्वनीत शब्दामागचा मतीतार्थ वेगळा वेगळा आहे इथेच आपल्याला वर्तनवाद व ज्ञानरचनावाद यातला फरक समजून घेता येईल.

**वंदना लंगोटे, दिपाली दिक्टे – प्रशिक्षक**

**परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे**

# शिक्षणाचे वैविध्य पूर्ण पैलू

सुरवातीच्या काळात मानवाच्या काही मुलभूत गरजा जसे अन्न,वस्त्र,निवारा या मानल्या जात होत्या. परंतु कालानुरूप त्यात आरोग्य व शिक्षण या गरजा ही अनिवार्य असल्यामुळे त्यांचा ही समावेश करण्यात आला. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे काळापरत्वे त्याचे स्वरूप हे बदलत चालले आहे, त्याचाच आढावा आपण सदर लेखात घेणार आहोत.

अगदी पुरातन काळापासूनच विदयार्जन हा माणसाच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे पण कालांतराने विदयार्जन करणे, म्हणजे शाळेत जाणे हा पर्यायी अर्थ आपण घेतला आणि पुढे हा समज रूढ झाला. नंतर शाळेसारखीच विद्यालये, महाविद्यालये,आणि नंतर विद्यापीठे असा पिरॅमिड तयार झाला.पण पिरॅमिडच्या खालच्या भागात विराजमान झाली ती म्हणजे शाळा. शाळा आजच्या शिक्षण पद्धतीतील एक मुलभूत घटक आहे असे म्हटले जाते. शाळेत शिकलेल्या गोष्टी आयुष्यभर रक्तासारख्या सळसळत राहतात शाळा जरी पिरॅमिडच्या खालच्या स्तरावर असली तरी तिचा प्रभाव हा वरच्या स्तरापर्यंत पोहचला जातो.

शालेय शिक्षणाच्या विस्ताराबाबतीत बोलायचे झाले तर तो पुष्कळ झाला आहे, म्हटलं तर तो पुष्कळच अपुरा आहे. जीवनाला उपयोगी पडेल अस त्यात फारस काही आहे का? हा कळीचा मुद्दा आहे. शाळा शिकणे, पुढील वर्गात जाणे,उत्तम गुण संपादन करणे व नोकरी ही चौकट म्हणजे शिक्षण हा अर्थ रूढार्थाने आज ही वापरला जातोय. उच्च शिक्षणातील स्पर्धा वाढल्याने शिकण्याच्या प्रक्रियेतील जीवनपयोगी मूल्ये,तत्त्वे,विचार आणि गोष्टी शिकण्याचा भाग मागे राहिला जात आहे. शिक्षण,आचरण,कर्म आणि जीवन या सगळ्या गोष्टींचा ताळमेळच आपण हरवून गेलोय असे दिसते.

आज विद्यार्थ्यांच्या शिक्षणातल्या आणि पर्यायाने जीवनातल्या यश-अपयशाची जबाबदारी अंतिमतः विद्यार्थ्यांवरच आहे. शिक्षणातून विद्यार्थ्याला पुरेस ज्ञान मिळाले आहे का? तो स्वतःच जीवन घडवू शकतो का? याच उत्तरदायित्व घेणाऱ्यांची संख्या मोजकी दिसून येते.

शिक्षणक्षेत्रात एकूणच सामाजिक उत्तरदायित्वाचा अभाव दिसून येत आहे का? हा विचार करायला लावणारा मुद्दा आहे. या सर्वांचा दूरगामी परिणाम आता पालकांना दिसू लागला आहे.अनेक वर्षांपासून असलेली गरज आता वाढू लागली आहे आणि ती म्हणजे शैक्षणिक बदलांची.

आजच्या शिक्षण पद्धतीतून मनुष्य सुशिक्षित होतो पण तो सुजाण,सुसंस्कृत होतो का? याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. उलट अधिक तर माणसे आत्मकेंद्रित,स्वार्थी,व संकुचित वृत्ती कडे चाललेली दिसून येतात.

जागतिक स्पर्धेचा विचार करता शिक्षणाचा कल हा तांत्रिक गोष्टींकडे जास्त जाताना दिसतो त्यामुळे

सर्वच वयोगटातील मुलं त्यांची  मानसिकता,आवडी-निवडी,छंद,कला या सर्व महत्त्वाच्या गोष्टींना शिक्षण प्रक्रियेत किती स्थान देतात हा कळीचा प्रश्न वाटतो.

एका प्रसिद्ध वाक्यामध्ये सांगायचे म्हटले तर 'We don't need followers, we need Ideals'. अशी मुले घडवणारे शैक्षणिक बदल हवे आहेत. ज्यामध्ये शिकण्याची प्रक्रियासुद्धा मुले ठरवतील. अर्थातच मान्यता पावलेले आदर्श व्यक्तिमत्त्व नेहमीच आपल्याला उपयुक्त असेलच. भारतीय युवकांच्या दृष्टीने स्वामी विवेकानंद,महात्मा गांधी व अलीकडच्या काळातील म्हंटले तर डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनाच आदर्श का म्हणावे ? कारण या व्यक्तींची नैतिकता व मूल्य तसेच त्यांनी आत्मसात केलेले शिक्षण हे त्यांनी आपल्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांनी त्या शिक्षणाचा वापर समाजाच्या हितासाठी केला.

प्लेटोच्या काळापासून विचारवंत सांगत आले आहेत कि,शिक्षण हे केवळ माहितीचे आदानप्रदान होऊ नये.शिक्षणातून चारित्र्य घडावे,सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वे घडावीत.प्राचीन गुरुकुल पद्धतीत राजपुत्र सुद्धा गुरूच्या घरी राहत.कौरव-पांडव वा श्रीकृष्ण सुदाम्याप्रमाणेच पाणी भरण्याचे वा लाकडे फोडण्याचे काम करीत.हे कष्टांचे संस्कारच होते.

गौतम बुद्धांनी म्हंटलच आहे कि," मी सांगतो म्हणून माझ्यावर विश्वास ठेऊ नका,धर्मग्रंथात आहे म्हणून आंधळेपणाने स्वीकार करू नका,तर सर्व विचार तुमच्या बुद्धीवर तपासून पहा आणि योग्य-अयोग्य काय ते ठरवा". आपल्या मुलांना ही आपण असे स्वातंत्र्य देऊयात...

**ऋतुजा राजगुरू, पल्लवी बर्गे – प्रशिक्षक**

**परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे**

## JOURNEY OF VOCATIONAL EDUCATION IN INDIA

This quarterly bulletin on Education in the Past ,in the Present and in Future would be incomplete if we don't discuss VOCATIONAL EDUCATION .Vocational Education prevailed in Ancient India , prevails today and will continue to be there in future too .

**Vocational education** is **education** that prepares people to work in a trade, a craft, as a technician, or in support roles in professions such as engineering, accountancy, nursing, medicine, architecture, or law. It directly develops expertise in techniques related to technology, skill and scientific technique to span all aspects of the trade.

### NEED FOR VOCATIONAL EDUCATION

India is a country with the highest "youth" in the coming decade. Hence the working population is going to be young and dynamic. We need to focus on vocational education in India as there are no proper certificates or formal education in place for manual work or various blue collared jobs like construction worker, maids,carpenters,painters to name a few.Vocational education is a job-oriented education which will help a person in becoming skilled in a particular field at a comparatively young age or acquire a particular skill at any stage of life and would be competent to set up a small establishment of his or her own. Some industries take students at a young age and give them specialized training to suit the needs of the employer. During apprenticeship these young fellow are sometimes given a small amount as salary so that they can support themselves.

### Vocational and Industrial Education in Ancient India

In ancient India a child followed the occupation of his father, either religious or professional and his training in that particular field was inhouse provided by his father Sanskrit was the medium of instruction in the Vedic system of education, Pali was the medium of instruction in the Buddhist system of education. But both system offered vocational education apart from religious education of their respective faiths. There was also a purely vocational system of education wherein master craftsmen and

artisans taught their skills to students who worked as apprentice under them.

**Uniqueness of Ancient Indian Education**: From time immemorial, India has explicitly recognized that the supreme goal of life is self-realization and hence the aim of education has always been the attainment of such a fullness of being. But at the same time it was also recognized that different individuals have naturally different inclinations and capacities. Hence not only the highest philosophy but also ordinary subjects like literature and science as also vocational training find a place in ancient education system. The education system of ancient India may claim to be unique in the world in many respects like-

- The State and the society did not in any way interfered with the curriculum of studies or regulating the payment of fees or hours of instructions.
- Another special characteristic of ancient Indian educational system was it was fully and compulsorily residential. The student had to live in the house of his teacher for the whole duration of his studies and learn from him not only what was taught but also observe how his teacher responded to different situation arising in daily life and learn from it.
- Stress was laid on having a personal relation between the teacher and the taught. Each student used to meet the teacher separately and learn from him through separate instruction and guidance.

  Education was absolute free and the teacher looked after the primary needs of the students including food and clothing.

- The Indian system of education upheld the dignity of labour. Hence even a student aiming at the highest philosophical knowledge was duty bound to do some manual labour daily such as collecting fuel, tending cattle, etc.
- Education in ancient India was more of seminar type where students used to learn through discussions and debates.

**Aims of Education**: The aims of education were to provide good training to young men and women in the performance of their social, economic and religious duties. Also preservation and enrichment of culture, character and personality development and cultivation of noble ideals were the other aims of education in ancient India.

**Commencement of Education**: In the Vedic system, education of a child commenced at the age of five with the ceremony called Vidyarambha. It was marked by learning

the alphabets for the first time and offering worship to Goddess Saraswathi. But it was only after the initiation ceremony called Upanayana or Pabbajja.. After the initiation ceremony the child left his home to live in an ashrama or monastery under the guidance and supervision of his guru or preceptor (monk).

**Education of Women**: A high standard of learning and culture was reached by Indian women during the Vedic age. In addition to training in the arts of housekeeping they learnt music and dancing. Like boys, girls had to undergo the upanayana ceremony. There were two classes of educated women, *Sadyodwahas*– who prosecuted studies till their marriages and *Bramhavadinis* who did not marry and pursued their studies though out their lives.

**Vocational Education**: A majority of people earned their livelihood by following various professions. Ancient Indian literature refers to sixty-four arts which include weaving, dyeing, spinning, art of tanning leather, manufacture of boats, chariots, the art of training elephants and horses, art of making jewels, implements and equipment, art of dance, music, agriculture, building houses, sculpture, medical science, veterinary science, the profession of a chemist, manufacture of perfumes and a host of other professions. In the vocational system of education young men used to work as apprentices under a master for a number of years and gained expertise in their respective professions. The apprentices were taught free of cost and provided with boarding and lodging by the master.

**Methods of Learning**: In ancient India close relationship existed between the pupil and the teacher. The teacher used to pay individual attention on his students and used to teach them according to their aptitude and capability. Knowledge was imparted orally and the different methods of learning were-

- *Memorization,CriticalAnalysis,Introspection, Story telling,Question and Answer methodHands-on method–Seminars–*
    - **Period of Study**: It took 12 years to master one Veda. Hence depending upon the wish of the student to learn as many subjects, the period of study varied. It was 12 years, 24 years, 36 years or 48 years. A graduate was called Snataka and the graduation ceremony was called Samavartana.

**Types of Teachers**:

- ***Acharya*** was a type of teacher who taught his pupil Vedas without charging fee from the pupils.
- ***Upadhyaya*** was the one who adopted teaching as a profession to earn his livelihood and taught only a portion of the Veda or Vedangas.
- ***Charakas*** or wandering scholars toured the country in quest of higher knowledge. ***Guru*** was the one who used to lead a gruhasta life and earn his livelihood after imparting education to his disciples and maintain his family.
- ***Yaujanasatika*** were teachers famous for their profound scholarship that students from distant places, as far as from a distance of hundreds of miles would come to seek their guidance.
- ***Sikshaka*** was a teacher who gave instruction in arts like dancing.

**Educational Institutions**:The different educational Institutions were named as per the stage of education

The***Gurukul,Parishads.Goshti..Ashramas, Vidyapeeta ,Ghathikas Agraharas ,Mathas , Brahmapuri Vihara.***

**Famous Educational Institutions**:

**Takshasila**: **Nalanda**: **Vallabhi**: **Vikramasila**:

**High Standard of Education**: The quality of education imparted in ancient India was unparalleled. Hence in spite of various hardship and hurdles students from different parts of the world flocked to Indian universities.

**The education of the young craftsman in India was entirely vocational. Though the religious side of the boy's education was not neglected, on the literary side it was defective. Yet, as a vocational education, it was not lacking in elements that made it really valuable. The affectionate family relationship between teacher and pupil, the absence of artificiality in instruction, and the opportunity and encouragement to produce really good work these—all helped to build up a spirit of good craftsmanship.**

## VOCATIONAL EDUCATION IN MODERN INDIA

Vocational courses are becoming more and more popular every year. The New Education policy clearly spells out that vocationalization should be introduced in schools and colleges all over the country at the +2 stage soon after ten years of schooling. Vocation based or job-oriented course have been introduced not only at the +2 stage but also at the degree level. Several colleges in the country are running vocational courses and turning technically

trained people in different fields. The day is not far off when there will be no unemployment in the country and we shall be able to usher in an era where every head is high, where every hand is busy, where every heart is happy.

**Vocational education** or *Vocational Education and Training* (VET), also called *Career and Technical Education* (CTE), prepares learners for jobs that are based in manual or practical activities, traditionally non-academic and totally related to a specific trade, occupation or *vocation*, hence the term, in which the learner participates. It is sometimes referred to as *technical education*, as the learner directly develops expertise in a particular group of techniques or technology.

Vocational education can be at the secondary or post-secondary level and can interact with the apprenticeship system. Increasingly, vocational education can be recognised in terms of recognition of prior learning and partial academic credit towards tertiary education (e.g., at a university) as credit; however, it is rarely considered in its own form to fall under the traditional definition of a higher education.

````However, as the labor market becomes more specialized and economies demand higher levels of skill, governments and businesses are increasingly investing in the future of vocational education through publicly funded training organizations and subsidized apprenticeship or traineeship initiatives for businesses. At the post-secondary level vocational education is typically provided by an institute of technology, or by a local community college.

## NATIONAL VOCATIONAL EDUCATION QUALIFICATION FRAMEWORK(NVEQF)

The process of development of a National Vocational Education Qualifications Framework (NVEQF) is presently underway. The NVEQF would set common principles and guidelines for a nationally recognized qualification system, covering schools, vocational education institutes and institutes of higher education with qualifications ranging from secondary to doctorate level, leading to international recognition of national standards. Students would have the scope for vertical and horizontal mobility with multiple entry and exits. The corner stone of the NVEQF would be the close partnership and collaboration with the industry/ potential employers at all stages starting from identification of courses, content development, training and provision of resource persons, assessment,
````

accreditation, certification and placement Extensive consultations with the State Govts have been carried out. A group of State Education Ministers from 12 States has been constituted to prepare the NVEQF.

**Centrally Sponsored Scheme of Vocationalisation of Secondary Education**

The Centrally Sponsored Scheme of Vocationalisation of Secondary Education was launched in year 1988. The Scheme was implemented through State/UTs and NGOs /VA in the formal and non-formal sector respectively through institutions like **Central Board of Secondary Education (CBSE), National Institute of Open Schooling (NIOS),Sub-Mission and Establishments on Polytechnics, Jan shikshan Sansthan (JSS), Craftsmen training in ITIs**

## SELF EMPLOYMENT OPPORTUNITIES

Besides the various traditional courses designed to meet the demands of Industry, a number of other Specialised vocations have mushroomed which have provided Self Employment with investments within reach of common man.Some of them are listed below.

**Technical-Vocational-Livelihood Track**

**TESDA Training Regulations-Based Specializations**

| HE | ICT | Agri-Fishery Arts | Industrial Arts |
|---|---|---|---|
| 1. Beauty/Nail Care<br>2. Wellness Massage<br>3. Dressmaking<br>4. Front Office Services<br>5. Travel Services<br>6. Cookery<br>7. Hairdressing<br>8. Tailoring<br>9. Caregiving<br>10. Food and Beverage Services<br>11. Bread and Pastry Production<br>12. Housekeeping<br>13. Tour Guiding Services<br>14. Tourism Promotion Services<br>15. Attractions and Theme Parks Tourism<br>16. Handicraft (Needlecraft)<br>17. Handicraft (Fashion Accessories and Paper Craft)<br>18. Handicraft (Woodcraft) | 1. Computer Hardware Servicing<br>2. Illustration<br>3. Technical Drafting<br>4. Contact Center Services<br>5. Computer Programming<br>6. Medical Transcription<br>7. Animation | AGRICROP PRODUCTION<br>1. Crop Production<br>2. Horticulture<br>3. Landscape Installation and Maintenance<br>4. Organic Agriculture Production<br>5. Pest Management<br>6. Rice Machinery Operation<br>ANIMAL PRODUCTION<br>1. Animal Production<br>2. Artifical Insemmination<br>3. Raising Large Ruminants (Dairy Cattle and Buffaloes)<br>4. Raising Swine<br>5. Slaughtering<br>FISH PRODUCTION<br>1. Aquaculture<br>2. Food (Fish) Processing<br>3. Fishport/Wharf Operation | 1. Masonry<br>2. Automotive Servicing<br>3. Refrigeration and Air-Conditioning<br>4. Consumer Electronics Servicing<br>5. Electrical Installation and Maintenance<br>6. Shielded Metal-Arc Welding<br>7. Carpentry<br>8. Plumbing (NC I)<br>9. Plumbing (NC II)<br>10. Tile Setting<br><br>**Each subject will have 80 hours per semester.** |

7

DEPARTMENT OF EDUCATION

We can conclude that the 21st century youth will no longer be without a vocation and will be enterprenaurs.

**Compiled by : Mrs. Vijaya Joshi (Volunteer, Dss Pune ) - 9850537625**

# होमस्कूलिंग – स्वयंरचित शिक्षणपद्धतीच्या वाटेवर

शिक्षण म्हटलं की शाळा आणि शाळा म्हटलं की वेळापत्रक हे समीकरण गेल्या काही पिढ्यांपासून अगदी पक्कं झालं आहे. शिक्षण किंवा जगभर ज्याला सार्वजनिक शालेय शिक्षण - पब्लिक स्कूलिंग – म्हटलं जातं, त्याची सुरुवात खरं तर एकोणिसाव्या शतकात झाली. त्यापूर्वी समान अभ्यासक्रम, समान बोर्ड, समान परीक्षा, वगैरे गोष्टींचे संदर्भ सापडत नाहीत. तेव्हा स्थानिक परिस्थितीनुसार शिक्षणपद्धती रचल्या जात असत. त्या शिक्षणपद्धतीवर स्थानिक भाषा, स्थानिक व्यवसाय, सांस्कृतिक व राजकीय विचारसरणी यांचा मोठा प्रभाव असे. त्यामुळं भौगोलिक अंतर, नैसर्गिक आपत्ती, सत्ताबदल, अशा गोष्टींनीही शिक्षणाचे प्रवाह बदलले, असं जागतिक इतिहासकारांचं म्हणणं आहे.

एकोणिसाव्या शतकात औद्योगिकीकरण आणि वसाहतवादा बरोबरच सार्वजनिक शालेय शिक्षणाचीही सुरुवात झाली. त्यामागचे हेतु काय होते, त्यातून फायदे जास्त झाले की तोटे, वगैरे गोष्टींची चर्चा करणं या लेखाचा उद्देश नाही. पण स्वयंरचित शिक्षणपद्धती किंवा सेल्फ-डिझाईन्ड एज्युकेशन सिस्टीम ही संकल्पना नवीन वगैरे नसून, उलट सार्वजनिक शालेय शिक्षणपद्धतीपेक्षा ती जुनी आहे, एवढंच सांगण्यासाठी हे इतिहासाचे दाखले. अर्थात, त्या काळी असे 'स्वयंरचित' वगैरे शब्द कुणी वापरलेही नसतील, पण संकल्पना मात्र तशीच आहे.

शिक्षण कशासाठी घ्यायचं? हा एक ज्वलंत वादविवादाचा मुद्दा राहिलेला आहे. स्थल-काल-व्यक्तीपरत्वे याचं उत्तर वेगवेगळं असणार हे नक्की. पण सर्वसाधारणपणे, ज्ञानार्जनातून स्वतःचा व पर्यायानं समाजाचा विकास, अर्थार्जनाच्या अधिक संधी व त्यातून कुटुंबाच्या जीवनमानात सुधारणा, अशा काही ढोबळ प्रेरणा शिक्षण घेण्यामागं दिसून येतात. बदलती जागतिक परिस्थिती व रोजगाराच्या संधी यांच्यासाठी स्थानिक परिस्थितीनं रचलेल्या शिक्षणपद्धती अपु-या पडू लागल्या आणि समान अभ्यासक्रम, समान कौशल्ये, समान गुणमापन पद्धतीचं सार्वजनिक शालेय शिक्षण लोकांना सोयीचं, आश्वासक, आणि आवश्यक वाटू लागलं. म्हणूनच, व्यक्तिगत, कौटुंबिक, व सामाजिक प्रगतीसाठी शाळेत जाऊन शिक्षण घेतलंच पाहिजे, अशी भावना मोठ्या प्रमाणावर तयार झाली. या शिक्षणपद्धतीची यशस्वी उदाहरणं समोर येतील तसा अधिकाधिक लोकांचा कल शालेय शिक्षणाकडं वाढत गेला.

असं असलं तरी, आपल्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितींमुळं समाज एकाच वेळी दोन टोकाच्या गटांत विभागत गेला. एका बाजूला पिढ्यांमागून पिढ्या शालेय आणि उच्च शिक्षणाच्या प्रवाहात पुढं जात असतानाच दुस-या बाजूला पिढ्यान्‌पिढ्या शाळेचं तोंड न बघितलेले लोकही इथं दिसतात. याबरोबरच, जागतिकीकरण, शहरीकरण, रोजगारासाठी स्थलांतर, तांत्रिक प्रगतीचा वेग, अशा अनेक घटकांचा या शिक्षणामुळं मिळणा-या संधींवर आणि कौशल्यांवर परिणाम होत आहे. त्यामुळं या

शिक्षणपध्दतीबद्दल ‘आवश्यक पण बेभरवशाची’ असं लोकांचं काहीसं संमिश्र मत बनलं आहे.

याशिवाय, सार्वजनिक शालेय शिक्षणपद्धतीबद्दल सध्याच्या शिकलेल्या पिढीच्या मनात काही तक्रारी तयार झाल्या आहेत.

उदाहरणार्थ –

- मुलांचा कल लक्षात न घेता साचेबद्ध शिकवण्याची पद्धत,
- सर्वांना समान वागवण्यामुळं काही अंशी दडपली जाणारी मुलांची अंगभूत कौशल्यं,
- परीक्षा आणि गुणमापन पद्धतींचा अतिरेक,
- व्यक्तिगत मार्गदर्शनाचा अभाव,
- शालेय शिक्षणासाठी मोजावी लागणारी किंमत, इत्यादी.

या गोष्टींवर कुणाकडे ही रामबाण उपाय तयार नसले तरी, या समस्या टाळण्याच्या दृष्टीनं लोकांनी पर्यायी शिक्षणपद्धतींचा विचार करायला सुरुवात केली आहे.

आपल्या घरामधे, कुटुंबामधे, परिसरामधे ज्ञान मिळवण्याचे स्रोत उपलब्ध नसतील किंवा असले तरी ते पुरेसे नसतील तर सार्वजनिक शालेय शिक्षणपद्धतीतूनच ते मिळवावे लागेल. परंतु, ज्यांच्याकडे असे स्रोत उपलब्ध आहेत, त्यांनी आपल्या मुलांचा कल, आपली परिस्थिती, व्यक्तिगत ध्येय आणि उद्दीष्टं, यांचा विचार करुन पुन्हा स्वयंरचित शिक्षणपद्धतीचे प्रयोग सुरु केले आहेत. त्यापैकी ‘घरी राहून शिक्षण’ म्हणजे ‘होम-बेस्ड एज्युकेशन’ हा या लेखाचा विषय आहे.

‘होम-बेस्ड एज्युकेशन’ साठी‘ होमस्कूलिंग’ हा शब्द सध्या प्रचलित आहे. खरं तर ‘होम-बेस्ड एज्युकेशन’च्या दोन महत्त्वाच्या पद्धतींपैकी ‘होमस्कूलिंग’ ही एक पद्धत आहे. यामधे मुलं शाळेत जात नसली तरी घरीच शाळेसारखं शिकतात. म्हणजे, घरी राहून अभ्यास करायचं वेळापत्रक पाळलं जातं. वयानुरुप त्या-त्या इयत्तेचा अभ्यास केला जातो. त्यासाठी लागणारी पुस्तकं, शैक्षणिक साधनं, चाचण्या, खाजगी शिकवणी, परीक्षा, आणि गुणमापन पद्धती जवळपास शाळेसारखीच असते. म्हणजे पूर्णवेळ कॉलेजमधे जाणं शक्य नसेल तर घरुन अभ्यास करुन बाहेरुन परीक्षेला बसता येतं, तसाच काहीसा प्रकार. वर सांगितल्याप्रमाणं शाळेबद्दलच्या तक्रारी टाळून तोच अभ्यास घरी राहून केला जातो. शक्यतो दहावी किंवा बारावीनंतर योग्य अभ्यासक्रम निवडून मुलं पुन्हा उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येतात.

‘होम-बेस्ड एज्युकेशन’चा दुसरा प्रकार म्हणजे ‘अन-स्कूलिंग’ किंवा मुक्त-शिक्षण. यामधेही मुलं शाळेत न जाता घरी राहूनच शिकतात. पण शिकण्यासाठी इयत्ता, वेळापत्रक, परिक्षा, असा कोणताही साचा नसतो. मुलांना प्रत्येक गोष्टीत प्रश्न विचारण्याची आणि त्यांची उत्तरं शोधण्याची सवय लागावी, असं वातावरण देण्याचा प्रयत्न या पद्धतीत केला जातो. औपचारिक शिक्षणपद्धतीत ज्यांचा ‘छंद’ या प्रकारात समावेश केला जातो, त्या कला, कौशल्ये, खेळ, इत्यादींसाठी मुक्त-शिक्षणात जास्त वेळ देता येतो. वयानुरुप विशिष्ट विषय व संकल्पनांचं ज्ञान मिळण्यापेक्षा व्यक्ती म्हणून मुलांच्या विकासावर जास्त भर दिला जातो. यामधे ज्ञानाचे स्रोत पुस्तकांबरोबरच, व्यक्तिगत भेटी व ओळखी, प्रवास व

निरीक्षण, परिसरातील उपक्रमांमधे सहभाग, स्वयंसेवी पद्धतीचे काम, असे निरनिराळे असतात. दहावी-बारावीनंतर उच्च शिक्षणासाठी मुख्य प्रवाहात परत येण्याचा पर्याय इथंही खुला असतोच.

साचेबद्ध शालेय शिक्षणपद्धतीला पर्याय म्हणून प्रायोगिक तत्वावर चालवल्या जाणा-या शाळाही (एक्स्पेरिमेंटल स्कूल्स) असतात. यामधे औपचारिक अभ्यासक्रम अनौपचारिक पद्धतीनं शिकवला जातो. वर्गात बसून शिकवण्यापेक्षा कृतीशील उपक्रमांवर जास्त भर दिला जातो. विषय, परिक्षा, वेळापत्रक यांचे नियम मुख्य प्रवाहातील शाळांच्या तुलनेत शिथिल केलेले असतात. काही पालक आपल्या मुलांना औपचारिक शाळेतून थेट होमस्कूलिंग किंवा अन-स्कूलिंगमधे न आणता अशा एक्स्पेरिमेंटल स्कूलमधे पाठवणं पसंत करतात. परंतु, एक्स्पेरिमेंटल असली तरी ही शाळा असल्यानं 'होम-बेस्ड एज्युकेशन'मधे या प्रकाराचा समावेश केला जात नाही.

वर सांगितलेल्या 'होमस्कूलिंग' आणि 'अन-स्कूलिंग' या दोन्ही स्वयंरचित शिक्षणपद्धती – सेल्फ-डिझाईन्ड एज्युकेशन सिस्टीम – म्हणता येतील. मुलांच्या, पालकांच्या, कुटुंबातील इतर सदस्यांच्या वेळेचं आणि कौशल्याचं नियोजन करुन या पद्धतीनं शिकण्याची आखणी करावी लागते. मुलांना काही गोष्टी शिकवणं, त्यांच्या प्रश्नांना उत्तरं मिळवून देणं, त्यांच्यासोबत काही उपक्रम स्वतः करणं, त्यांच्या इतरांशी ओळखी व प्रवास घडवून आणणं, या सगळ्यासाठी सर्वात महत्त्वाचा असतो पालकांचा वेळ. शाळेत जाऊन शिकणा-या आणि घरी राहून शिकणा-या मुलांमधे हा सर्वात महत्त्वाचा आणि मोठा फरक असतो. त्यामुळं, 'होम-बेस्ड एज्युकेशन' ही फक्त मुलांसाठीची शिक्षणपद्धती न राहता हळूहळू ती त्या कुटुंबाची जीवनपद्धतीच बनून जाते.

सुरुवातीलाच उल्लेख केल्यानुसार, शिक्षण म्हटलं की शाळा आणि शाळा म्हटलं की वेळापत्रक, हे समीकरण आपल्या मनात अगदी पक्कं झालेलं असतं. मग शाळेत न जाता घरी राहून मुलं शिकतात हे समजलं की पालकांना असंख्य प्रश्नांना तोंड द्यावं लागतं. उत्तरं द्यावी लागतात असं मी म्हणत नाही, कारण सगळ्या प्रश्नांची सगळ्यांना पटणारी उत्तरं असतीलच असं नाही. शिवाय स्वयंरचित शिक्षणपद्धतीचा अवलंब करण्यामागची प्रत्येक पालकाची भूमिका आणि कारणं खूप वेगवेगळी असू शकतात. काही निर्णय सखोल चर्चा आणि विचार करुन घेतलेले असतील, तर काहींचे निर्णय परिस्थितीजन्यही असू शकतील. पण या पालकांना विचारले जाणारे प्रश्न ठराविकच असतात, ते म्हणजे –

- मुलं शाळेत गेली नाहीत तर अभ्यास कसा करणार?
- मुलांचं सोशलायजेशन कसं होणार? समाजातले निरनिराळे घटक आणि स्तर त्यांना घरी राहून कसे बघायला मिळणार?
- मुलांना मित्र-मैत्रिणी कसे मिळणार? मुलांचं शेअरिंग कुणाबरोबर होणार?
- मुलांना शिस्त कशी लागणार? मुलांना कुणाचा तरी धाक कसा राहणार?
- दिवसभर घरी राहून मुलांना वेळेचं महत्त्व कसं कळणार?

- शाळेत न जाता सगळ्या विषयांचं ज्ञान कसं मिळणार?
- मुलांना स्पर्धेची, यशापयशाची सवय कशी होणार?
- मुलांना घरी राहून बक्षिसं, सर्टीफिकेटं, जाहीर कौतुक, वगैरे कसं मिळणार?
- शाळेत न गेल्यानं क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, सण-उत्सव यामधे भाग घेण्याची, कला-गुण दाखवण्याची संधी मुलांना कशी मिळणार?
- सतत घरी राहिल्यानं मुलांच्या आणि पालकांच्या नात्यावर परिणाम नाही का होणार?
- शाळेत न जाता मुलांचं करीअर कसं होणार?

वगैरे वगैरे.

हे सर्व प्रश्न पडण्यामागं महत्त्वाचं कारण म्हणजे या प्रकारच्या शिक्षणपद्धतीचे प्रॉडक्ट म्हणता येतील अशी उदाहरणं समोर न दिसणं. गेल्या काही वर्षांमधे पालकांनी 'ट्रायल-अ‍ॅन्ड-एरर' पद्धतीनं होमस्कूलिंग, अन-स्कूलिंग, एक्पेरिमेंटल स्कूलिंग या सर्व प्रकारांच्या मिश्रणातून मुलांच्या विकासासाठी प्रयत्न केले आहेत. अगदी अलीकडं होमस्कूलिंग किंवा अन-स्कूलिंग केलेल्या मुलांना मोठ्या युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळाल्याच्या किंवा नोकरी-व्यवसायात ही मुलं चमकल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. पण तरीही सध्याच्या प्रस्थापित शालेय शिक्षणपद्धतीला पर्याय म्हणून ही वेगळी पद्धत ताबडतोब स्वीकारली जाईल, इतकी ही उदाहरणं भरीव आणि भरपूर नाहीत.

एकंदरीतच मुलांचा विकास ही हळू-हळू होणारी प्रक्रिया असल्यानं या पद्धतींचं यशापयश ठरवताना संयम राखण्याची गरज आहे. मुलांच्या शिक्षणाभोवती – विकासाभोवती आपली लाईफ-स्टाईल रचून पालक मुलांच्या आणि स्वतःच्याही भविष्यातील अनिश्चिततेचा धोका पत्करत आहेत. विशेष म्हणजे, मुलांचं 'होम-बेस्ड एज्युकेशन' राबवणारे पालक स्वतः लहानपणी औपचारिक शाळेत जाऊनच शिकले आहेत. त्यामुळं, मुलांच्या लर्निंगपूर्वी पालकांचं अन-लर्निंग होत असतं. हा विषय असाच शिकायचा असतो, हे असंच पाठ करायचं असतं, असले प्रश्न विचारायचे नसतात, अशा अनेक गोष्टी पालकांना 'अन-लर्न' कराव्या लागतात. मुलांना पुरेसा वेळ देण्यासाठी स्वतःच्या वेळेचं आणि कामाचं व्यवस्थित नियोजन करावं लागतं. मुलांना ज्ञानाचे स्रोत उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतःला ते माहिती करुन, शक्य झाल्यास पडताळून पहावे लागतात. संबंधित विषयतज्ज्ञांशी मुलांच्या ओळखी करुन देण्याआधी स्वतःचं वर्तुळ विस्तारावं लागतं. थोडक्यात, मुलांच्या बरोबरीनं स्वतःच्या शिक्षणाची आणि विकासाची वाट धरावी लागते.

स्वयंरचित शिक्षणपद्धतीमधे सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पालकांच्या मुलांकडून असणाऱ्या अपेक्षांचं व्यवस्थापन. प्रस्थापित औपचारिक शिक्षणपद्धतीपासून फारकत घेताना, त्या शिक्षणपद्धतीचे संभाव्य फायदे आपल्या मुलांना मिळणार नाहीत याची जाणीव पालकांनी ठेवणं आवश्यक आहे. सध्याच्या तथाकथित स्पर्धेच्या युगात आपल्या मुलांना आपणच कुठली आयुधं देत आहोत हे त्यांच्या यशापयशाच्या मूल्यमापनाआधी तपासून

पहावं. एक व्यक्ती म्हणून मुलांचा विकास घडवण्यासाठी पालक प्रयत्नशील असतील तर, योग्य वयात आपल्या मुलांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करण्याची आपली तयारी आहे का हेही स्वतःला विचारावं.

समाजातील सर्वच घटकांना एकाच वेळी एकसारखीच शिक्षणपद्धती लागू करता येणं शक्य नाही. व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती आणि ध्येय यांच्यानुसार प्रत्येकाच्या गरजा व अपेक्षा वेगवेगळया असणार आहेत. आपल्या स्वतःच्या परिस्थितीचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन करुन आजूबाजूला उपलब्ध असणा-या पर्यायांमधून उत्तम पद्धती तयार करणं, हाच खरा मार्ग असणार आहे. ही आपणच आपल्यासाठी बनवलेली अथवा निवडलेली पद्धती स्वयंरचित शिक्षणपद्धतीच्या पर्यायांमधे आज ना उद्या स्थान मिळवेलच.

**मंदार शिंदे**
**(सह-संचालक,डोअर स्टेप स्कूल पुणे. )**
९८२२४०१२४६
mandar@doorstepschool.org

# सर्व लेखातील संदर्भ :

- परिवर्तनशील शिक्षण : लीला पाटील
- आजचे शिक्षण  एक वास्तव : शांता मालेगावकर
- उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण : डॉ. सुरेश करंदीकर , मीना मंगरुळकर
- आपला शैक्षणिक वारसा : दि. ग. आपटे
- स्मार्ट क्लासरूम स्ट्रीट स्मार्ट मुले : आशिष पेंडसे
- शिक्षकांपुढील आव्हाने :  अश्विनी भांडेकर
- महाराष्ट्र मंथन : मनोहर सोनवणे.
- शिकू या आनंदे : रेणू दांडेकर
- जेष्ठ शिक्षणतज्ञ राम ताकवले मुलाखत साभार
- S.Srinivas on Ancient education system in India
- Vocational Educational system in India ….MHRD

## ऑक्टोंबर २०१६ ते डिसेंबर २०१६ या तिमाहीत घेतली गेलेली प्रशिक्षणे :-

| दिनांक | प्रशिक्षण प्रकार | विषय | प्रशिक्षणार्थी संख्या |
| --- | --- | --- | --- |
| ऑक्टोबर २०१६ | कास्प प्लॅन (३ दिवस) | जोडाक्षरे, गणित व गणित साधने | १९ |
| | ECCC+PPCE | गटबांधणी | ३३ |
| नोव्हेंबर २०१६ | शिक्षिका पुनः प्रशिक्षण (६ गट) | गोष्ट | २०९ |
| | पुस्तकपरी पुन:प्रशिक्षण (८ गट) | वेळेचे व्यवस्थापन | ३२९ |
| | ४ ठिकाणी - नविन पुस्तकपरी प्रशिक्षण (४ दिवस) | **१ ला दिवस -** संस्थेची माहिती, पुस्तक देणे घेणे. | पिरंगुट- १८ |
| | | **२ रा दिवस -** भाषिक खेळ. | फुगेवाडी- २१ |
| | | **३ रा व ४ था दिवस -** १ ली उपक्रम (मुळाक्षर, बाराखडी, जोडाक्षर) | स्वारगेट व परिवर्तन – ६७ |
| डिसेंबर २०१६ | शिक्षिका पुनः प्रशिक्षण (६ गट) | वेळेचे व्यवस्थापन | २०६ |
| | पुस्तकपरी पुन:प्रशिक्षण (८ गट) | गटबांधणी | २८९ |
| | ECCC + PPCE Staff | बालसमुह गट | २८ |
| | ECCC + PPCE - New Teacher | गणित साधने | १७ |
| | ECCC + PPCE + SOW - New Teacher | भाषा साधने | २२ |
| | SOW Teacher Refresher | हिंदी भाषा साधने (मुंबई डोअर स्टेप) | ७ |
| | पाया प्रकल्प पर्यवेक्षक- समन्वयक प्रशिक्षण | Assertive Communication & Resilience | ३७ |
| | वाचन संस्कार प्रकल्प पर्यवेक्षक- समन्वयक प्रशिक्षण | स्मरण कौशल्य | ३० |

## परिवर्तन प्रशिक्षण केंद्रात तिमाहीत घेतलेल्या प्रशिक्षणांची निवडक क्षणचित्रे :

ECCC\PPCE प्रकल्पातील पर्यवेक्षक समन्वयकांना प्रशिक्षण देताना संसाधन व्यक्ती –



पाया प्रकल्पातील पर्यवेक्षक-समन्वयकांचे प्रशिक्षण घेताना संसाधन व्यक्ती –



कास्प संस्थेतील कर्मचारी वर्गास प्रशिक्षण देताना परिवर्तन प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षक –



वाचन संस्कार प्रकल्पातील पर्यवेक्षक-समन्वयकांचे प्रशिक्षण घेताना संसाधन व्यक्ती –



पुस्तकपरी पुनःप्रशिक्षण देताना प्रशिक्षक –



शिक्षिका पुनःप्रशिक्षण देताना प्रशिक्षक –



## पुढील अंकाचा विषय “आकलन व अभिव्यक्ती”

# परिवर्तन प्रशिक्षण केंद्रातील उपलब्ध मार्गदर्शिका-

- प्रशिक्षक हस्तपुस्तिका
- बालवाडी
- पाळणाघर
- भाषा-गणित साधने
- अनौपचारिक वर्ग
- प्रकल्प - भाग १ ते ३
- गाणी – भाग १ ते ३

# डोअर स्टेप स्कूल संचलीत,परिवर्तन प्रशिक्षण केंद्रातून दिली जाणारी प्रशिक्षणे –

### विभागानुसार दिली जाणारी प्रशिक्षणे -

- बाल मानसशास्त्र
- बालवाडी
- पाळणाघर
- शिकवण्याच्या पध्दती
- गणित- भाषा साधने
- प्रकल्प पध्दती
- फलक लेखन
- वाचन कौशल्ये
- गाणी/गोष्टी
- भाषिक खेळ
- अहवाल लेखन
- साधन- साहित्य बनविणे
- बालसंरक्षण
- मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग

### उपयुक्त विषयांची प्रशिक्षणे -

- वेळेचे व्यवस्थापन
- नेतृत्व (लिडरशिप)
- पर्यवेक्षक भुमिका आणि जबाबदा-या
- संवादकौशल्ये
- बालहक्क
- शिक्षण हक्क कायदा
- सृजनशीलता
- फिडबॅक देणे- घेणे
- स्वयंमूल्यमापन
- सादरीकरण कौशल्ये
- आकलन /अभिव्यक्ती
- ताणाचे व्यवस्थापन
- गट बांधणी

वरील पैकी कोणत्याही विषयाच्या प्रशिक्षणासाठी आमच्याशी संपर्क साधा.

**मुख्य कार्यालय –**

डोअर स्टेप स्कूल,पुणे
११०,परिमल,आनंदपार्क,औंध
पुणे- ४११००७
मो.-९७६६३३७४३२/३१

**प्रशिक्षण केंद्र –**

डोअर स्टेप स्कूल,पुणे
परिवर्तन प्रशिक्षण केंद्र,
सदाशिव पेठ-४१०३०
मो.-९७६६३३७४३५

Visit us on: www.doorstepschool.org, Follow us on: http://www.facebook.com/doorstepschool